# *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. रामाआ-नाशिक/द्वितीय अपील क्रमांक :- ४५३/२०२२/नंदुरबार**

१ श्री. दिनेश सुरेश देवरे, : अपिलार्थी
रा. मु. पो. सोनगीर,
ता. जि. धुळे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहाय्यक प्रशासन अधिकारी,
(सामान्य प्रशासन विभाग),
जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
(सामान्य प्रशासन विभाग), जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार.

**सुनावणी दिनांक ०६/०५/२०२२**

अपिलार्थी यांनी दिनांक २१/१२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक ०६/०५/२०२२ रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी उपस्थित होते. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीदरम्यान विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्वपरवानगी न घेता संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित आहेत. वास्तविक सामान्य प्रशासन विभागाने

शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

"माहिती उपलब्ध करुन देण्यानुषंगाने संबंधित जन माहिती अधिकाऱ्याने तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने माहिती उपलब्ध करुन देण्यात हेतुपुरस्सरपणे टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल. द्वितीय अपील सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी, आयोगाने आदेशित केले असल्यास प्रथम अपिलीय अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता द्वितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल".

शासनाच्या अशा स्पष्ट सूचना असतानादेखील संबंधित विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक २५/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असमाधानकारक निर्णय पारित केला. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक २५/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१/११/२०१२ ते माहिती मिळेपर्यंतच्या कालावधीतील श्रीमती पौर्णिमा रामचंद्र पाडवी, तत्कालीन वरीष्ठ सहाय्यक यांनी स्वेच्छा निवृत्ती घेण्यासाठी सादर केलेला म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील निमय १०(४) मधील तरतुदीनुसार सादर केलेला विनंती अर्ज व त्यानुषंगाने सेवा निवृत्ती मंजूरी बाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीचे कागदपत्र मिळणेबाबत माहिती मागितली होती. त्यास अनुसरुन अपिलार्थीस दिनांक २०/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये श्रीमती पाडवी यांची आस्थापना कार्यालयास नसल्यामुळे मागणी केलेली माहिती (सेवापुस्तकातील) उपलब्ध नसल्याबाबत वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविले आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक २६/१०/२०२१ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक २६/१०/२०२१ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर दिनांक २३/११/२०२१ रोजी निर्णय पारित

करुन शासन परिपत्रक दि. १७ ऑक्टोबर, २०१४ परिशिष्ट ३ मधील तरतुदींनुसार अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी असुन वैयक्तिक स्वरुपाची असल्याने माहिती नाकारण्यात येत आहे, असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढले.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २५/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत कार्यालयातील उपलब्ध माहितीबाबत वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविल्याचे स्पष्ट होते. तसेच जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान आयोगास सुचित केले की, अपिलार्थी यांनी श्रीमती पौर्णिमा रामचंद्र पाडवी यांच्या दिनांक ३१/०७/२०१२ रोजीच्या स्वेच्छा निवृत्तीबाबतच्या अर्जाची माहिती मागितली असुन सदर अर्ज कार्यालयास प्राप्त नाही आणि सेवा निवृत्तीबद्दल कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तसेच अपिलार्थी यांनी श्रीमती पौर्णिमा रामचंद्र पाडवी यांच्या सेवा पुस्तकाची माहिती ही वैयक्तिक माहिती मागितली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ११ (१) मध्ये असे नमूद केले आहे की, " या अधिनियमान्वये केलेल्या विनंतीवरुन जेव्हा, यथास्थिती, एखाद्या केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास, किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्यास, त्रयस्थ पक्षाशी संबंधित असलेली किंवा त्यांच्याकडून पुरविण्यात आलेली आणि त्या त्रयस्थ पक्षाकडून गोपनीय समजली जाणारी कोणतीही माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग पुरवावयाचा असेल तेव्हा, यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिकारी, किंवा राज्य जन माहिती अधिकारी, अशी विनंती करण्यात आल्यापासून पाच दिवसाच्या आत त्या विनंतीबाबत आणि यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिकारी, किंवा राज्य जन माहिती अधिकारी ती माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग, प्रकट करण्यास इच्छुक असल्याबाबत लेखी नोटीस अशा त्रयस्थ पक्षास देईल आणि त्रयस्थ पक्षाला, अशी माहिती प्रकट करावी किंवा कसे, या संबंधात लेखी किंवा मौखिक निवेदन सादर करण्यासाठी, आमंत्रित करील आणि माहिती प्रकट करण्याचा निर्णय घेताना त्रयस्थ पक्षाचे असे निवेदन विचारात घेण्यात येईल : परंतु, कायद्याने संरक्षण दिलेल्या व्यावसायिक किंवा वाणिज्यिक गुपितांच्या बाबतीत असेल ते खेरीज करुन, जर लोकहितार्थ अशी माहिती प्रकट करणे हे, अशा त्रयस्थ पक्षाच्या हिताला होणारी कोणतीही संभाव्य हानी किंवा क्षती यापेक्षा अधिक महत्वाचे असेल तर, ती माहिती प्रकट करण्याची परवानगी असेल." प्रमाणे वैयक्तिक

माहिती असल्याने संबंधिताकडून माहिती का देऊ नये या बद्दल नोटीस देवून त्यांचा जबाब घेऊन पुढील कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर माहिती ही वैयक्तिक असल्याने ती अर्जदार यांना देण्यात येवू नये असे प्रथम अपिलाच्या निर्णयात नमुद करुन माहिती नाकारली हे योग्य नाही. तसेच अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान नमूद केले की त्यांना माहिती प्राप्त झालेली नसून माहिती मिळावी. तरी आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली श्रीमती पौर्णिमा रामचंद्र पाडवी यांच्या राजीनाम्याबाबतची माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरवावे. तसेच सेवापुस्तकाबाबतच्या माहितीबाबत अधिनियमातील कलम ११ (१) प्रमाणे कार्यवाही करुन संबंधित त्रयस्थ पक्षाचा जबाब नोंदवून जनहित समाविष्ट असणारी माहिती आहे किंवा नाही याची शहानिशा करुन माहिती पुरविण्याचा अथवा नाकारण्याचा निर्णय घेऊन माहिती अथवा वस्तुस्थिदर्शक उत्तर अपिलार्थीस पुरवून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करणे योग्य होईल.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २५/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली श्रीमती पौर्णिमा रामचंद्र पाडवी यांच्या स्वेच्छानिवृत्तीबाबतची माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरवावे. तसेच त्यांच्या सेवा पुस्तकाबाबतची माहितीबाबत अधिनियमातील कलम ११ (१) प्रमाणे कार्यवाही करुन संबंधित त्रयस्थ पक्षाचा जबाब नोंदवून जनहित समाविष्ट असणारी माहिती आहे किंवा नाही याची शहानिशा करुन माहिती पुरविण्याचा अथवा नाकारण्याचा निर्णय घेऊन माहिती अथवा वस्तुस्थिदर्शक उत्तर अपिलार्थीस नोंदणीकृत पोचदेय डाकेने अथवा समक्ष विनामुल्य पुरवून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द वरील परिपत्रकास अनुसरुन नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

३) वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ४५३/२०२२/नंदुरबार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

**प्रति,**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार, ता. जि. नंदुरबार.

यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलट टपाली आयोगाला सादर करावी, तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

---

क्रमांक : रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र./४५३/२०२२/नंदुरबार ओ-१४४५ दिनांक 30/08/2022

---